आकाशवाणी नागपूर,
प्रादेशिक बातम्या (मराठी–वेळ सायंकाळी ०६.००)
रविवार दिनांक १३ ऑक्टोबर २०२४

ठळक बातम्या

1. पंतप्रधान गतीशक्ती बृहद आराखड्याला तीन वर्ष पूर्ण झाल्याबद्दल पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे प्रशंसोद्गार.

2. शेतकऱ्यांना दिवसा मोफत वीज देण्यासाठी सौर कृषी वीज वाहिनी कंपनी १४ हजार मेगावॅट ऊर्जा उत्पन्न करणार-उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची माहिती.

3. माजी राज्यमंत्री बाबा सिद्दीकी यांची काल रात्री गोळया झाडून हत्या; आज शासकीय इतमामात होणार अंत्यसंस्कार.

4. आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर महाविकास आघाडीच्या प्रमुख नेत्यांनी महायुती सरकारविरुद्ध जारी केलं आरोपपत्र.

पंतप्रधान गतिशक्ति

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी, पंतप्रधान गतिशक्ती या उपक्रमाला, तीन वर्षे पूर्ण झाल्याबद्दल कौतुक केलं आहे. एका सोशल मीडिया पोस्टमध्ये ते म्हणाले की, गतिशक्तीनं मल्टी-मॉडल, कनेक्टिव्हिटीमध्ये महत्त्वपूर्ण योगदान दिलं आहे. या उपक्रमानं, भारताच्या पायाभूत सुविधांची, पुनर्रचना करण्यात महत्त्वाची भूमिका बजावली असल्याचं ते म्हणाले. विविध भागधारकांच्या समन्वयामुळ, कामातील विलंब कमी झाला असून, नवीन संधी निर्माण झाल्या आहेत असं, पंतप्रधान म्हणाले. गतिशक्ति उपक्रमाच्या माध्यमातून, विकसित भारताच्या स्वप्नाच्या ध्येयपूर्तीकडे, वेगानं वाटचाल सुरु असून, त्यामुळ प्रगती, नवोन्मेष आणि उद्योजकतेला, प्रेरणा मिळत आहे असं, ते म्हणाले. २०२१ मध्ये सुरु झाल्यानंतर, पी.एम.गतिशक्ति उपक्रमा अंतर्गत, आजपर्यंत विविध मंत्रालयांच्या समन्वयानं, १५ लाख कोटी रुपयांचे, २०८ पायाभूत प्रकल्प पूर्ण झाले आहेत.

उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणविस

गोंदिया जिल्ह्यातल्या तिरोडा-गोरेगाव मतदार संघातली, ७५ हजार हेक्टर जमीन सिंचनाखाली येणार असल्यानं, हा मतदारसंघ सुजलाम्-सुफलाम् होणार आहे अशी ग्वाही, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज दिली. तिरोडा-गोरेगाव विधानसभा क्षेत्रातल्या, धापेवाडा उपसा सिंचन योजना, टप्पा क्रमांक दोन अंतर्गत, पाच हजार २१७ कोटी रुपयांच्या विकास कामांचं तसंच, तिरोडा नगर परिषद आणि गोरेगाव नगर पंचायत क्षेत्रातल्या, २०५ कोटी रुपयांच्या विकास कामांचं भूमिपूजन आज फडणवीस यांच्या हस्ते झालं, त्यावेळी ते बोलत होते. आजवर सर्वाधिक निधी आमच्या सरकारनं सिंचनासाठी उपलब्ध करून दिला असल्याचं त्यांनी सांगितलं. शेतकऱ्यांना वीज पंपाचं बिल माफ केल्याचं सांगून यापुढ शेतकऱ्यांना दिवसा देखील मोफत वीज पुरविण्यासाठी, सौर कृषी वीज वाहिनी कंपनी तयार केल्याचं फडणवीस म्हणाले

*शेतकऱ्यांचं म्हणणं आहे कि मोफत वीज तर पाहिजेच पण त्यासोबत आम्हाला दिवसा १२ तास वीज पाहिजे. शेतकऱ्यांकरिता देशातलं पाहिलं राज्य महाराष्ट्र आहे कि महाराष्ट्राने शेतकऱ्यानंकरता वेगळी कृषी वीज वाहिनी कंपनी तयार केली आणि त्या कंपनीच्या माध्यमातून १४ हजार मेगावॅट सौर ऊर्जा आपण उत्पन्न करतो आहे. फिडर सेपरेशन करून प्रत्येक फिडर सोलरवर नेतो आहे. त्याच काम सुरु झालेलं आहे. पुढच्या १५ ते १८ महिन्यामध्ये हे सगळं काम पूर्ण होईल आणि त्यानंतर आमच्या शेतकऱ्याला दिवसा १२ तास ३६५ दिवस आम्ही मोफत वीज त्या ठिकाणी देऊ कोणालाही रात्री शेतीमध्ये जावं लागणार नाही ही व्यवस्था आपल्या सरकारने केली आहे.*

केंद्रीय माहिती प्रसारण मंत्रालयाचे सचिव

केंद्रीय माहिती प्रसारण मंत्रालयाचे सचिव संजय जाजू यांनी आज सांगितलं की माहिती प्रसारण मंत्रालया अंतर्गत असणाऱ्या माध्यम एककांद्वारे केंद्र सरकारच्या योजना चांगल्या रीतीने जनसामान्यांपर्यंत पोहोचवल्या जात आहेत. आज नागपूर आकाशवाणी येथे माहिती प्रसारण मंत्रालयाच्या विविध कार्यालय प्रमुखांशी तसेच अधिकाऱ्यांची त्यांनी आढावा बैठक घेतली त्यावेळी ते बोलत होते.

*हमें पूरी उम्मीद है की हमारे सारे मिडिया यूनिट्स - एक बोहोत बड़ा अमला है हमारा यहाँ पर विदर्भ रीजन को केटर करता हुआ. न केवल आकाशवाणी और दूरदर्शन के हमारे बहुत सारे इंस्टीट्यूशन है, साथ ही आय.आय.एम्.सी. अमरावती हमारा एक मेजर ट्रेनिंग इंस्टीट्यूशन है। इसके अलावा हमारे इन्फोर्मेशन एंड ब्रोडकास्टिंग मिनिस्ट्री का जो इन्फ्रा स्ट्रक्चर है उससे रिलेटेड गतिविधियोंको हमने आज बारीकी से देखा. और मुझे पूरी उम्मीद*

*है की भारत सरकार के विभिन्न कार्यक्रमोंको जनता तक पहुचाने में हमारे सारे मिडिया यूनिट्स अपना योगदान आनेवाले समय में देंगे.*

विदर्भातील नागपूर अमरावती तसेच इतर दुर्गम नक्षलग्रस्त भागात देखील केंद्र सरकारच्या योजनाचा कसा प्रतिसाद मिळत आहे ते या कार्यालयाच्या माध्यम एककाकेंद्वारे कळते. या आढावा बैठकीत महत्त्वपूर्ण सूचना अधिकाऱ्यांनी दिल्या. यानंतर संजय जाजू यांनी आकाशवाणीतील स्टुडिओ तसेच परिसराची पाहणी केली. स्वच्छता अभियान त्याचप्रमाणे एक पेड मा के नाम या उपक्रमात देखील माहिती प्रसारण मंत्रालयाच्या एककांनी सक्रिय सहभाग नोंदवल्याच त्यांनी सांगितले.

वाचन प्रेरणा दिवस

माजी राष्ट्रपती डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम यांचा, १५ ऑक्टोबर हा जन्मदिवस, 'वाचन प्रेरणा दिन' म्हणून साजरा करण्यात येतो. यंदाच्या वर्षीही सर्व शासकीय, निमशासकीय कार्यालयं, शासकीय संस्था, मंडळं, सार्वजनिक उपक्रम कार्यालयांनी, विविध उपक्रमांचं आयोजन करावं, असे निर्देश, शासनानं दिले आहेत. वाचन प्रेरणा दिनानिमित्त, विदर्भ साहित्य संघातर्फे, १५ ऑक्टोबर रोजी, दुपारी चार वाजता, 'कथा अभिवाचन' होईल. यात विवेक अलोणी, विनय मोडक, कल्याणी गोखले यांचा सहभाग असेल, तर सायंकाळी सहा वाजता जिल्हाधिकारी कार्यालय आणि भाषा संचालनालय यांच्या संयुक्त विद्यमानं, 'विदर्भ, माझ्या मातीतील लेखक आणि माझा वाचन प्रवास' या विषयावर, प्राध्यापक अविनाश कोल्हे यांचं व्याख्यान, आयोजित करण्यात आलं आहे.

आमदार पंकज भोयर

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेला, राज्यासह वर्धा जिल्ह्यात उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेच्या लाभामुळ, महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणाला बळ मिळालं असून, यामुळ राज्याच्या आर्थिक प्रगतीला हातभार लागत असल्याचं प्रतिपादन, आमदार डॉ.पंकज भोयर यांनी केलं. महिला आणि बाल विकास विभाग आणि जिल्हा महिला आणि बाल विकास अधिकारी कार्यालय, यांच्या संयुक्त विद्यमानं, आज वर्ध्यातील, स्वावलंबी मैदान इथं, आयोजित महिला मेळाव्यात ते बोलत होते.

बाबा सिद्दिकी

माजी राज्यमंत्री बाबा सिद्दिकी यांच्यावर, शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्याच्या सूचना, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिल्या आहेत. उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी, कूपर रुग्णालयात, बाबा सिद्दिकी यांचे चिरंजीव, आमदार झिशान सिद्दीकी यांच्यासह, त्यांच्या कुटुंबियांची सांत्वनपर भेट घेत, सहसंवेदना व्यक्त केल्या. काल रात्री वांद्रे इथल्या निर्मल नगरजवळ, बाबा सिद्दीकी यांची गोळया झाडून, हत्या करण्यात आली होती. या घटनेनंतर बाबा सिद्दीकी यांना, वांद्रे इथल्या लीलावती रुग्णालयात दाखल करण्यात आलं होतं. बाबा सिद्दिकी हे, २००४ ते २००८ या काळात, विविध खात्यांचे राज्यमंत्री आणि म्हाडाचे अध्यक्ष होते. राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष, अजित पवार गटाचे नेते आणि माजी राज्यमंत्री बाबा सिद्दिकी यांच्या पार्थिवावर, मरीन लाईन्स इथल्या, बडा कब्रस्तान स्मशानभूमीत, शासकीय इतमामात, आज अंत्यसंस्कार करण्यात येणार आहे. याप्रकरणी दोन आरोपींना अटक करण्यात आली असून, त्यापैकी एक उत्तर प्रदेशचा तर दुसरा हरियाणाचा आहे. मुंबईत कोणत्याही परिस्थितीत कायदा सुव्यवस्था बिघडू नये याची काळजी घेण्याचे निर्देश, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी पोलिसांना दिले आहेत. या प्रकरणातील आरोपीला कठोर शिक्षा होईल असं आश्वासनही त्यांनी दिलं. दरम्यान, राजकीय नेत्याच्या हत्येमुळं, विरोधी पक्षांनी राज्यातील कायदा आणि सुव्यवस्थेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केलं आहे. विधानसभेतील विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी राज्यातील कायदा आणि सुव्यवस्था बिघडली आहे असा आरोप करत, गृहमंत्र्यांच्या राजीनाम्याची मागणी केली आहे.

मविआ पत्रकार परिषद

मुंबईत वांद्रे इथं, महाविकास आघाडीच्या, आज झालेल्या पत्रकार परिषदेत सरकारवर टीका करत आरोपपत्र जारी करण्यात आलं. महाविकास आघाडीच्या आज झालेल्या पत्रकार परिषदेत, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष, खासदार शरद पवार, कांग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले, माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण, विरोधी पक्ष नेते विजय वडेट्टीवार, खासदार अनिल देसाई, खासदार संजय राऊत, विनायक राऊत, वर्षा गायकवाड, सुप्रिया सुळे, आमदार आदित्य ठाकरे आदी मान्यवर उपस्थित होते. उत्तम राज्य आणि प्रशासन यासाठी ओळखल्या जाणाऱ्या महाराष्ट्राची स्थिती वर्तमान सरकारनं उध्वस्त केली आहे. सरकारमध्ये असलेल्या पक्षांनी केवळ शिवसेना आणि राष्ट्रवादी यांच्याशी गद्दारी केली नाही

तर, ही गद्दारी महाराष्ट्राशी झालेली आहे. आज राजकीय नेते सुरक्षित नाहीत यासाठी हे सरकार घालवणं आवश्यक असल्याचं, ठाकरे म्हणाले. महायुती सरकार हे गुजरात धार्जिणे आहे. त्यामुळ या सरकारला, सत्तेतून बाहेर काढणे हेच, महाविकास आघाडीचं लक्ष्य आहे, असं प्रतिपादन, पटोले यांनी केलं. महायुती सरकारनं, शेतकऱ्यांना मदत केली नाही, पीक विम्यातून शेतकऱ्यांचा फायदा होत नाही. महाराष्ट्रात दररोज सात शेतकरी आत्महत्या करत असून, तरुण मुले शिक्षण घेऊन, नोकरीची प्रतिक्षा करत आहेत पण या सरकारनं, सर्व उद्योग आणि रोजगार गुजरातला पळवले आहेत असा आरोप, नाना पटोले यांनी पत्रकार परिषदेत केला.

<u>नितीन गडकरी</u>

वाशिम इथं शासकीय वैद्यकीय महाविद्यालय सुरू झालं असून, त्याला पूरक अशा वैद्यकीय उपकरणांचा कारखाना वाशिम जिल्ह्यात लवकरच सुरू करण्यात येणार आहे अशी माहिती, केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी दिली. ते आज वाशिम इथं, तपोनिधी या ग्रंथाच्या द्वितीय आवृत्तीच्या प्रकाशन सोहळयात बोलत होते. या कारखान्यामुळ तीन हजार युवकांना रोजगार मिळेल असंही, त्यांनी सांगितलं.

<u>हवामान</u>

वर्धा, गोंदिया, यवतमाळ, चंद्रपूर आणि नागपूर जिल्ह्यांसाठी विजांचा कडकडाट होण्याची शक्यता असल्यानं हवामान खात्यानं, त्यासंदर्भात काळजी घेण्याच्या सूचना जारी केल्या आहेत. अशा वेळी झाडांखाली, मोकळ्या जागांवर, टेकड्यांवर जाण टाळावं आणि शक्यतोवर घरात राहावं असं सांगण्यात आलं आहे.

<u>मुनगंटीवार</u>

राज्याचे वनं, सांस्कृतिक कार्य आणि मत्स्यव्यवसाय मंत्री, सुधीर मुनगंटीवार यांच्या पुढाकारामुळ, चंद्रपूरच्या ऑटोरिक्षा चालकांसाठी, अत्यंत आकर्षक असा ऑटोस्टँड साकारला आहे. याचं लोकार्पण, मंत्री मुनगंटीवार यांच्या हस्ते झालं.

पत्रकार साहित्य संम्मेलन

उदगीर इथल्या 'रंगकर्णी साहित्य, कला आणि क्रीडा प्रतिष्ठानच्या' वतीनं, वीस ऑक्टोबर रोजी आयोजित करण्यात आलेल्या, पहिल्या राज्यस्तरीय पत्रकार साहित्य संम्मेलनाच्या अध्यक्षपदी अहिल्यादेवी होळकर विद्यापीठातील माजी वृत्तपत्र विभाग प्रमुख, ज्येष्ठ पत्रकार डॉ.रविंद्र चिंचोलकर, यांची निवड करण्यात आली आहे. तर, उद्घाटक म्हणून मराठी पत्रकार परिषदेचे विश्वस्त, एस.एम.देशमुख हे असतील.

****